मुदतवाढ देण्यात आली आहे. अपर पोलीस महासंचालक (नि.व स.) यांनी दि.१८.३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये M/s Ernst and Young या कंपनीच्या सल्लागाराची दि.२०.९.२०२३ ते दि.३१.१२.२०२३ या कालावधीची देयके अदा करण्याची विनंती केली असता सदर नस्ती मान्यतेसाठी सादर केल्यावर विभागाचे दि. ७.१२.२०२३ च्या शासन निर्णयानुसार ६ महिन्यांची मुदतवाढ (९.७.२०२३ ते १९.९.२०२३) देण्यात आली होती परंतु ज्या प्रयोजनार्थ मुदतवाढ देण्यात आली ते प्रयोजन पूर्ण झाले किंवा कसे याबाबत पोलीस महासंचालकांचे प्रथम अभिप्राय मागविण्यात यावेत अशा सूचना अ.मु.स. (गृह) यांनी दिल्या. त्यानुसार दि.९.५.२०२४ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक कार्यालयाकडून वरीलप्रमाणे अभिप्राय देण्याची विनंती करण्यात आली होती. त्यावर अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांनी दि.२७.५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये आपले अभिप्राय सादर केलेले आहेत. पोलीस महासंचालक स्तरावरील प्रकल्प सल्लागार समितीने मे.अर्नेस्ट अँड यंग या सल्लागार कंपनीचे उर्वरीत दि.२०.९.२०२३ ते दि.३१.१२.२०२३ या कालावधीतील केलेल्या कामकाजाचे व देयकांचे अवलोकन व पडताळणी केली असून मे.अर्नेस्ट अँड यंग यांनी सदर कालावधीत केलेल्या कामाबाबतचा अहवाल योग्य व समाधानकारक असल्याचे समितीच्या दि.१२.३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रमाणित केले आहे. समितीने प्रमाणित केल्यानुसार तसेच अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांच्या दि.१८.३.२०२४ व दि.२७.५.२०२४ रोजीच्या पत्रास अनुलक्षून आता मे.अर्नेस्ट अँड यंग यांनी सादर केलेल्या रु.१५,३२,८९६/- एवढ्या रक्कमेचे देयक अदा करण्याची विनंती करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पासाठी मे.अर्नेस्ट अँड यंग या सल्लागार कंपनीला माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.५.१०.२०२३ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्यानुसार प्रतिव्यक्ती-प्रतिमहा (Man-Month) तत्वावर मानधन अनुज्ञेय करण्यात आले आहे. सदर कंपनीने उपरोक्त प्रकल्पासंदर्भात (Project Monitoring Support Post Go-Live) दि.२०.९.२०२३ ते दि.३१.१२.२०२३ या कालावधीसाठी पाहिलेल्या कामाची देयके अदा करण्याचा शासन निर्णय दि.३१.१.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आला. तथापि, सदरचे देयकासाठी वित्त विभागाकडून दि.३१.३.२०२५ रोजी बीडीएस प्रणालीवर निधी वितरीत झाला. तद्नंतर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दि.३.४.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे बील पोर्टल तांत्रिक अडचणींमुळे लॉग इन होत नसल्याने सदरची देयके दि.३१.३.२०२५ रोजी विहीत वेळेत कोषागारात सादर करणे शक्य झाले नाही व हा निधी २०२४-२५ मध्ये खर्च झाला नाही. यास्तव सदर निधी सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात मंजूर करण्याची केलेली विनंती विचारात घेता त्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय :-

राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण प्रकल्पासाठी मे. अर्नेस्ट अँड यंग या सल्लागार कंपनीची प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. माहिती व तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय दि.५.१०.२०२३ अन्वये निश्चित केल्यानुसार त्यांना मानधन अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यानुसार मे. अर्नेस्ट अँड यंग कंपनीला राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणुन Project Monitoring Support Post Go-Live करीता दि.२०.९.२०२३ ते दि.३१.१२.२०२३ या कालावधीसाठी **रु.१५,३२,८९६/- (रुपये पंधरा लाख बत्तीस हजार आठशे शहाण्णव फक्त)** इतक्या रकमेची देयके अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच समक्रमांकाचा दि.३०.१.२०२५ रोजीचा शासन निर्णय याद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहे.

